THE INDIAN EXPRESS, SATURDAY, JUNE 4, 2016



Union HRD Minister Smriti Irani digitally launches 10 projects, which includes SPPU's project of Digital Classroom and E-content learning modules, under the centrally sponsored scheme RUSA on Friday. After the launch, she addressed dignitaries, professors and students in different states through video conferencing from New Delhi. Arul Horizon

# Irani announces national competition to promote research among students

## Minister says students can send their research proposals directly to Centre

**Talking about the steps taken to prevent student suicides, Smriti Irani said that all universities had been asked to set up counselling and guidance centres. She added that parents share equal responsibility and must stop exerting pressure on students**

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, JUNE 3

UNION MINISTER Smriti Irani announced that a national-level competition to promote research and innovation among students will start from August 15 and students will contribute their ideas directly to the central government. She was replying to a question by a student of the Savitribai Phule Pune University at an event on Friday.

Irani, who was in New Delhi, was addressing dignitaries, professors and students through a web-conferencing facility during the nationwide digital launch of 10 infrastructure projects under the Ministry of Human Resource and Development's Rastriya Uchchatar Scheme (RUSA), which includes SPPU's project of Digital Classroom and E-content learning modules.

After the formal launch, Irani, who addressed the audience in Marathi, congratulated the team from the 'Oxford of the East' for their achievement.

Replying to a question from student Shweta Joglekar about how students can contribute to government plans of Make in India and Smart Cities, Irani replied that the research proposals of students will be welcomed through the new scheme. She invited students to suggest a name, logo and slogan of the competition.

Irani was asked by Shantanu Joshi, another student, about schemes initiated by her ministry to promote research among students, and she asked him to prepare a proposal and come to New Delhi.

On being asked by a student from Gadchiroli about the steps taken to prevent student suicides, she said that all universities had been asked to set up counselling and guidance centres. She added that parents share equal responsibility and must stop exerting pressure on students. Meanwhile, the event also saw the digital launch of projects from Andhra Pradesh, Chhattisgarh, Jammu and Kashmir, Odisha, Punjab, Mizoram, Sikkim, Jharkhand and Telangana.

The event was organised at SPPU's department of management sciences (PUMBA) where state project director of RUSA, Manisha Verma, SPPU vice-chancellor Wasudeo Gade, vice-chancellors of seven state universities and other dignitaries were present.

SATURDAY JUNE 4, 2016
Sakal Times

# SPPU introduces digital classrooms

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**Pune:** Savitribai Phule Pune University (SPPU) designed Digital Classroom and E-Content Learning modules was inaugurated by Union Human Resources Minister Smriti Irani through a video conference on Friday. These classrooms and modules will be used by the universities of Maharashtra state for the betterment of higher education.

The digital classrooms are equipped with Internet-enabled touch screen android TV and interactive white boards. It enables students to study in real time from number of experts with video conferencing. There is also a document camera that allows teachers to project live experiments, 3D objects and diagrams to the entire class.

The classroom also has an interactive dual board that students can interact with sitting anywhere in the 20 such classrooms.

Under the E-Content Learning module, there are equipments installed to create lecture series, TED like talks and panel discussions, etc. There is also real time messaging protocol that makes it possible to view video in any location without buffering. The initiative will help more than five lakh students and 800 colleges. Till now, 200 hours of support material has been created and courses are across health, management, sciences, social sciences, IT and electronic disciplines. The university has been granted Rs 4.72 crore for the same. All this has been funded by Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA) a Centrally Sponsored Scheme (CSS).

At the digital launch of the modules, the vice chancellors of seven universities: Aurangabad, Nanded, Solapur, Amravati, ICT Mumbai and Gondwana along with Ith Vasudeo Gade of SPPU were present. Manisha Verma, State project director of Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA).

Along with the inauguration of Maharashtra's digital platform, other initiatives of Andhra Pradesh, Chattisgarh, Jammu and Kashmir, Jharkhand, Mizoram, Odisha, Punjab, Sikkim and Telangana were also launched.



**LAUNCH:** A video conference with HRD Minister Smriti Irani at the SPPU where she digitally launched the 'Digital Classroom and E-Content Learning Modules'

## Pune students led to new programme

At the launch, students of SPPU wanted to share their academic projects with other students and give their inputs. Shantanu Joshi, a student from Department of Management Science, asked if students can get an e-platform like Ted talks, while Shweta Joglekar, a first year M Tech student, asked how can they contribute their academic research project. Irani thought over it for a while and declared that the two students should meet her in New Delhi and share ideas with her. Addressing the participants from the 10 states that were present, Irani announced that a platform will be proposed and students can add on to. The projects and the academic research from the point of view of education will be added to the platform.

A contest to suggest a name, logo and acronym for this scheme, which should reflect the vision and dynamism of the platform and have a national character will be held. The entries should reach the Centre by July 15 and winners will be announced by Aug 15.

# 'प्रोजेक्ट घेऊन दिल्लीला या; आपण भेटू'

## केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री इराणी यांचे विद्यार्थ्यांना मराठीतून प्रोत्साहन

पुणे, ता. ३ : 'विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प आणि संकल्पना मांडण्यासाठी केंद्र सरकार मंच स्थापन करून देणार का...' केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी शंतनू ढेशी याचा हा इंग्रजीतून प्रश्न. त्यांचे उत्तर मात्र मिळाले मराठीतून. "शंतनू, तुम्ही प्रकल्प बनवा आणि दिल्लीला घेऊन या."

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत महाराष्ट्रासह दहा राज्यांतील शैक्षणिक प्रकल्पांचे ई-उद्घाटन स्मृती इराणी यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील व्यवस्थापन विभागात (पुम्बा) दहा राज्यांतील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. विद्यापीठातील 'डिजिटल क्लासरूम' आणि 'ई कंटेंट लर्निंग मोड्यूल' या प्रकल्पांचे उद्घाटन त्यांनी केले. या वेळी कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, 'रुसा'च्या महाराष्ट्र प्रकल्प संचालक मनीषा वर्मा यांच्यासह राज्यातील सात विद्यापीठांचे कुलगुरू, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांकडून शंतनू याचा पहिला प्रश्न इंग्रजी भाषेतून आला. त्यावर मराठीत बोलत स्मृती इराणी यांनी त्याला, 'तुमचे नाव काय,' असा प्रश्न केला. नंतर मराठीत उत्तर देत 'शंतनू, तुम्ही प्रोजेक्ट बनवा आणि दिल्लीला घेऊन या. सामूहिक दौऱ्याचे आयोजन करा; आपण भेटू' अशा शब्दांत विद्यार्थ्यांना त्यांनी प्रोत्साहित केले.

### विद्यार्थ्यांवर स्वप्ने लादू नका!

गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाची विद्यार्थिनी मनालिनी टेकाम हिने विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्येची समस्या मांडली. यावर सरकार कोणत्या ठोस उपाययोजना करणार आहे? या प्रश्नावर इराणी म्हणाल्या, "विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व विद्यापीठांमध्ये समुपदेशन कक्ष स्थापन करण्याच्या सूचना केल्या आहेत. पालकांनी मुलांना त्यांची स्वप्ने साकार करू द्यावीत. स्वतःच्या स्वप्नांचे ओझे त्यांच्यावर लादू नये. त्यांना त्यांचे करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे."

### तेरा भाषांत अभ्यास साहित्य

ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत अडचण येते. 'आयआयटी'मध्ये जायचे असेल, तर इंग्रजी भाषेतून संकल्पना समजून घेण्यात अडचणी येतात. त्यामुळे 'आयआयटी' प्रवेशासाठी साहाय्यभूत ठरणारे 'ॲप' सुरू केले जाणार आहे. त्यात तेरा भारतीय भाषांमध्ये विविध विषयांवरील मोफत तासिका, जुन्या प्रश्नपत्रिका उत्तरसूचीसह उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी स्वतंत्र हेल्पलाइन सुरू केली जाईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनीदेखील योगदान द्यावे, असे इराणी म्हणाल्या.

### आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम

देशातील फक्त दहा राज्यांत रुसाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी केली जात होती. आता ३५ राज्ये जोडली गेली आहेत. देशभरातील दहा उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'स्टार्ट अप इंडिया' योजना सुरू होत आहे. सरकारी संस्थांमध्येही आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी अमेरिकेतील 'एमआयटी'सह पेनस्टेट, बर्कले, जॉर्जिया टेक अशा जगप्रसिद्ध विद्यापीठांची मदत केंद्र सरकार घेत आहे," असे इराणी यांनी सांगितले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : 'डिजिटल क्लासरूम' आणि 'ई-कंटेंट लर्निंग मोड्यूल' या प्रकल्पाच्या उद्घाटनानंतर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना स्मृती इराणी.

### मला मराठी चांगले येते!

गडचिरोलीतील मयूरी मडावी हिने मराठीतून प्रश्न विचारला. ग्रामीण भागात पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढे काय, असा प्रश्न पडतो? तसेच नोकरीला बाहेरगावी जावे लागते. त्या सुविधा आम्हाला तिथेच मिळतील का, असा प्रश्न केला. मनीषा वर्मा यांनी हा प्रश्न भाषांतर करून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांना रोखत, 'मला मराठी चांगले येते', असे इराणी यांनी सांगताच सभागृहात हशा पिकला. मराठीत उत्तर देत त्या म्हणाल्या, "केंद्र सरकार दोन महिन्यांत मोबाईल ॲप आणि संकेतस्थळ सुरू करणार असून, त्यावर याचशी कौशल्यपूर्ण अभ्यासक्रमांची माहिती असेल."

### पुण्यातील प्रश्नांना दाद

पुण्यातील श्वेता जोगळेकर या विद्यार्थिनीने, 'मेक इन इंडिया'सारख्या केंद्राच्या योजनेत विद्यार्थ्यांना कसे योगदान देता येईल, असा प्रश्न विचारला. त्यालाही मराठीतून उत्तर देत इराणी यांनी नावीन्यपूर्ण संशोधनाला वाव देण्यासाठी मंच सुरू करण्याचे सूतोवाच केले. त्यासाठी 'लोगो' आणि घोषवाक्याची राष्ट्रीय स्पर्धा घेण्याची घोषणा त्यांनी केली. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी मंत्रालयातर्फे परदेशी विद्यापीठांची मोफत सहल आयोजित केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### २१ डिजिटल क्लासरूम

महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, छत्तीसगड, काश्मीर, झारखंड, मिझोराम, ओडिशा, पंजाब, सिक्कीम आणि तेलंगण राज्यातील शैक्षणिक प्रकल्पांचे ई-उद्घाटन इराणी यांनी केले. कुलगुरू डॉ. गाडे म्हणाले, "रुसाच्या माध्यमातून मिळालेल्या निधीतून विद्यापीठात २१ डिजिटल क्लासरूम तयार करीत आहे."

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ शनिवार, ४ जून २०१६

# विद्यार्थ्यांसाठी 'ग्लोबल रीच'

## आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अभ्यासक्रमांसाठी ख्यातनाम विद्यापीठांशी करार



केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांना विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

देशभरातील सरकारी शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांनाही आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळविकास मंत्रालयाने विशेष पावले उचलली आहेत. मंत्रालयाने त्यासाठी जगभरातील चांगल्या दर्जाच्या विद्यापीठांमधील तज्ज्ञांची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी काही विद्यापीठांसोबत शैक्षणिक करार झाल्याची माहिती केंद्रीय मनुष्यबळविकासमंत्री स्मृती इराणी यांनी शुक्रवारी दिली.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) देशभरातील विविध विद्यापीठे आणि उच्च शैक्षणिक संस्थांमधील दहा निवडक प्रकल्पांचे औपचारिक उद्घाटन इराणी यांच्या हस्ते झाले. यानिमित्त इराणी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डिजिटल क्लासरूम आणि ई-कंटेंट जनि मॉड्युल्सचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उद्घाटन केले. या कार्यक्रमामध्ये इराणी यांनी मंत्रालयाच्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच, काही नव्या उपक्रमांच्या घोषणाही केल्या.

मंत्रालयाने 'रुसा'च्या माध्यमातून देशभरातील विद्यापीठांना पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भरीव अधिक निधी उपलब्ध करून दिला. शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या विकासावर आता पुढील टप्प्यात मंत्रालयाने भर दिला आहे. त्यासाठी मंत्रालयाने आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या केंब्रिज युनिव्हर्सिटी, पेनसिल्व्हेनिया युनिव्हर्सिटी, जॉर्जिया टेक युनिव्हर्सिटी आदी विद्यापीठांसोबत करार केले आहेत. त्यानुसार या विद्यापीठांमधील तज्ज्ञ भारतातील विद्यापीठांच्या अभ्यासक्रम निर्मितीसाठी मदत करू शकतील. त्याद्वारे सरकारी संस्थांमधील विद्यार्थ्यांना खासगी संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या तोडीचे अभ्यासक्रम शिकण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे इराणी यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.



केंद्रीय मनुष्यबळविकासमंत्री स्मृती इराणी यांनी विद्यार्थ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला.

### शिक्षणमंत्री अनुपस्थित

पुणे विद्यापीठात झालेल्या या कार्यक्रमासाठी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्यासह खासदार अनिल शिरोळे, पालकमंत्री गिरीश बापट उपस्थित राहणार होते. मात्र तावडे यांच्यासह इतर लोकप्रतिनिधींनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. इतर राज्यांमधून त्या त्या राज्यांच्या वरिष्ठ लोकप्रतिनिधी आणि शिक्षण खात्याशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. विद्यापीठ व इतर विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित असताना, तावडे यांची अनुपस्थिती मात्र इराणी यांनाही जाणवली. कार्यक्रमाच्या अखेरीस इराणी यांनी सर्वांचे आभार मानताना, तावडे यांनाही माझा नमस्कार सांगा, असा निरोप उपस्थितांना दिला. पक्षामध्ये तावडे आपल्यासाठी वरिष्ठ मार्गदर्शक असल्याची नोंद इराणी यांनी या निमित्ताने केली.

### लाइव्हलिहूड कॉलेजेस...

देशभरातील १८ उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी १० स्टार्टअप लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहितीही इराणी यांनी दिली. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकासासाठी देशभरात प्रत्येक राज्यात एक, अशी एकूण ३५ लाइव्हलिहूड कॉलेज मंत्रालयामार्फत सुरू केली जातील. तसेच, उच्च शिक्षणात स्थानिक भाषांचे महत्त्व वाढविण्यासाठी प्रत्येक राज्यात एक 'मॉडेल लँग्वेज लॅब' सुरू करण्यात येणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना चालना

विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना चालना देण्यासाठी मंत्रालय एक विशेष उपक्रम सुरू करणार आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांचे आदान-प्रदान हा त्यातील एक उपक्रम असेल. त्यासाठीचे बोधचिन्ह आणि नाव सुचविण्यासाठी देशभरातील विद्यार्थ्यांसाठी एक स्पर्धा त्यांनी जाहीर केली. त्यासाठी येत्या १५ जुलैपर्यंत मंत्रालयाकडे प्रवेशिका पाठवाव्यात. १५ ऑगस्टला या योजनेचे नाव आणि स्पर्धेतील विजेत्यांची घोषणा केली जाईल. या स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना सरकारी खर्चाने १४ दिवसांचा परदेश दौरा करण्याची संधी दिली जाईल. या दौऱ्यात परदेशातील चांगल्या दर्जाच्या शिक्षणसंस्थांना भेट देण्याचे अनोखे पारितोषिक विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

प्रभात पुणे, शनिवार, दि. ४ जून २०१६

# 'स्वयंम' ॲपद्वारे १३ भाषांत मोफत तासिका

## केंद्रीयमंत्री स्मृती इराणी : दहा राज्यांतील डिजिटल्स क्लासरूम, प्रयोगशाळेचे ई-उद्घाटन

**विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी स्वतंत्र हेल्पलाईन**

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मराठीतून संवाद**

पुणे दि. ३ (प्रतिनिधी) - ग्रामीण भागातून शहरात अभियांत्रिकीचे शिक्षण आवश्यक इंग्रजीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी संकल्पना समजण्यात अडचणी येतात त्यामुळे ते कोचिंग सेंटरला जाऊ शकत नाही. 'स्वयंम' नावाच्या मोबाइल ॲपद्वारे १३ भारतीय भाषांमध्ये विविध विषयांवरील मोफत तासिका, जुन्या प्रश्नपत्रिका उत्तरसूचीसह उपलब्ध करून दिले जाईल. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी स्वतंत्र हेल्पलाईन सुरू केली जाणार आहे. अशी माहिती केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी दिली.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) एकाच वेळी आज देशातील दहा राज्यांतील विद्यापीठांमधील डिजिटल्स क्लासरूम, प्रयोगशाळा, महाविद्यालयांचे ई-उद्घाटन स्मृती इराणी यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थितांशी मराठीतून संवाद साधला. पुणे विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात रुसाच्या राज्य प्रकल्प संचालक मनीषा वर्मा, कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, अन्य सात विद्यापीठांचे कुलगुरू प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

'संशोधन प्रकल्पांसाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय कोणते उपक्रम सुरू करत आहेत? असा प्रश्न शंतनु जोशी या विद्यार्थ्याने विचारला. त्यास मराठीतून उत्तर देत इराणी म्हणाल्या, 'संशोधनाचे तुम्ही प्रोजेक्ट बनवा आणि दिल्लीत या. आपण भेटून चर्चा करूया.' असे सांगत उपस्थितांची मने जिंकली.

श्वेता जोगळेकर या विद्यार्थिनीने मेक इन इंडिया, स्मार्ट सिटीसारख्या केंद्राच्या योजनेत विद्यार्थ्यांचे योगदान कशा स्वरूपाचे असेल? असा प्रश्न विचारला. या प्रश्नाला उत्तर देताना नाविण्यपूर्ण संशोधनाला वाव देण्यासाठी राष्ट्रीय स्पर्धेची घोषणा देखील यावेळी त्यांनी केली. या स्पर्धेचे नाव, मानचिन्ह, घोषवाक्य तयार करण्याचे आवाहन त्यांनी केले. १५ ऑगस्ट रोजी ही स्पर्धा सुरू केली जाईल. त्यामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून १४ दिवसांची परदेशी विद्यापीठांची सहल मोफत देण्याची घोषणा यावेळी केली.

'विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत असून केंद्र सरकार यावर काय उपाययोजना करणार? असा गडचिरोलीच्या मनालिनी टेकाम हिने प्रश्न उपस्थित केला. त्यावर इराणी म्हणाल्या, केंद्राने सर्व विद्यापीठांमध्ये समुपदेशन कक्ष स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परीक्षा काळात विद्यार्थी तणावग्रस्त असतात. त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशक नेमण्याची गरज आहे.

झारखंडमधील एका विद्यार्थिनीने सर्वांचे लक्ष वेधले. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्याशी संवाद साधताना विद्यार्थिनी म्हणाली मी ३५ कि.मी. अंतरावरून महाविद्यालयात येते. त्याच भागात एखादे महाविद्यालय सुरू करता येईल, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर तत्काळ इराणी म्हणाल्या, तुमच्या भागासाठी अडीच कोटी रुपयांची तरतूद करणार असून, त्याद्वारे नवीन महाविद्यालये सुरू करतील. मुलींच्या शिक्षणासाठी वाहतूक सुविधा उपलब्ध केली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी आंध्र प्रदेश, छत्तीसगड, काश्मीर, झारखंड, मिझोराम, ओडिशा, पंजाब, सिक्कीम आणि तेलंगणा राज्यातील विविध प्रकल्पांचे ई-उद्घाटन इराणी यांनी केले. राज्याच्या रुसाच्या प्रकल्प संचालिका मनीषा वर्मा यांनी रुसाअंतर्गत राज्यातील विद्यापीठामध्ये सुरू केलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कुलगुरू डॉ वासुदेव गाडे यांनी आभार मानले.



पुणे : विद्यापीठाच्या डिजिटल क्लासरूमचे ई-उद्घाटन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांशी संवाद साधला.

> आजपर्यंत खासगी संस्थांमध्येच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्याचे बोलले जायचे. परंतु आता सरकारी शैक्षणिक संस्थांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. याकरिता एमआयटी, केंब्रिज, वॉशिंग्टन, येल, जॉर्जिया टेक, पेनसिलिव्हिया अशा नामांकित विद्यापीठांची मदत घेतली जाणार आहे.
>
> **स्मृती इराणी**
> केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री

पुढारी | पुणे, शनिवार ४ जून २०१६

# 'मला मराठी येते; मराठीतून बोलणार...'

- स्मृती इराणींनी साधला विद्यार्थ्यांशी मराठीतून संवाद
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डीजिटल क्लासरूमचे ई-उद्घाटन

**पुणे : प्रतिनिधी**

पूर्वेकडचे ऑक्सफर्ड म्हणून ओळख असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या टीमसोबत बोलताना आनंद वाटतो. तुम्ही कसे आहात? मला मराठी येते... मी मराठीत बोलणार असे सांगत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना दिलखुलास उत्तरे देत तुम्ही नवीन संशोधनाचे प्रकल्प बनवा आणि दिल्लीत माझ्या कार्यालयात भेटायला या. तुमच्या नव्या कल्पना आमच्या कार्यालयाकडे सादर करा, सामूहिक दौऱ्याचे नियोजन करा. तुमचे स्वागत आहे.. असा केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी चक्क मराठीतून संवाद साधत सर्वांना सुखद धक्का दिला. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत एकाच वेळी शुक्रवारी देशातील सात राज्यांतील विद्यापीठांमधील डिजिटल क्लासरूम, प्रयोगशाळा, महाविद्यालयांचे मंत्री स्मृती इराणी यांच्या हस्ते ई-उद्घाटन केल्यानंतर त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थितांशी संवाद साधला.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र सभागृहात झालेल्या कार्यक्रमात रुसाच्या राज्य प्रकल्प संचालक मनीषा वर्मा, कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे तसेच राज्यातील इतर सात विद्यापीठांचे कुलगुरू आणि प्राध्यापक वर्ग या वेळी उपस्थित होता.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या (पुम्बा) सभागृहात झालेल्या कार्यक्रमात या वेळी राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) राज्य प्रकल्प संचालक मनीषा वर्मा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे तसेच राज्यातील इतर सात विद्यापीठांचे कुलगुरू आणि प्राध्यापक वर्ग या वेळी उपस्थित होता. महाराष्ट्रातील विविध भागातील आलेल्या विद्यार्थ्यांशी स्मृती इराणी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मराठीतून संवाद साधला. या प्रसंगी शंतनु जोशी या विद्यार्थ्याने संशोधन प्रकल्पांसाठी मनुष्यबळ खाते कोणते उपक्रम सुरू करीत आहे, या प्रश्नाला मराठीतून उत्तर देत इराणी म्हणाल्या, जेव्हा तुम्ही प्रोजेक्ट करावा आणि दिल्लीत या... आपण भेटून चर्चा करूया... असे सांगत उपस्थितांची मने जिंकली. श्वेता जोगळेकर या विद्यार्थिनीने मेक इन इंडिया, स्मार्ट सिटीसारख्या केंद्राच्या योजनेत विद्यार्थ्यांचे योगदान कशा स्वरूपाचे असेल, असा प्रश्न विचारला. या प्रश्नालाही इराणी यांनी मराठीतून उत्तर दिले. या वेळी नावीन्यपूर्ण संशोधनाला

पान ६ वर ▶

### सरकारी संस्थांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण

"दोन वर्षांपूर्वी देशातील फक्त ९ राज्यांत रुसाची अंमलबजावणी केली जात होती. मात्र, सद्यस्थितीत ३५ राज्ये उच्च शिक्षणाशी जोडली गेली आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षण पोहोचविण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे. देशभरातील ६० उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्टार्टअप इंडिया ही योजना सुरू केली जाणार आहे. तसेच ९५ महाविद्यालये स्किल इंडियाशी जोडली जाणार आहेत. रुसाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व राज्यातील शैक्षणिक संस्थांना फायदा होणार आहे. आजपर्यंत खासगी संस्थांमध्येच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्याचे बोलले जायचे; परंतु आता सरकारी शैक्षणिक संस्थांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. याकरिता एमआयटी, केंब्रिज, गॉर्हिटन, येल, जॉर्जिया टेक, पेनसिल्व्हेनिया अशा नामांकित विद्यापीठांची मदत घेतली जाणार आहे."

– स्मृती इराणी, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री

पान १ वरून...

## मला मराठी येते, मराठीतून बोलणार...

वाव देण्यासाठी राष्ट्रीय स्पर्धेची घोषणादेखील केली. या स्पर्धेचे नाव, मानचिन्ह, घोषवाक्य तयार करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. १५ ऑगस्ट रोजी ही स्पर्धा सुरू केली जाईल. त्यामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून १४ दिवसांची परदेशी विद्यापीठांची सहल मोफत देण्याची घोषणा या वेळी केली.

तत्पूर्वी, गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाची विद्यार्थिनी मनाली टेकाम हिने, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, केंद्र सरकार यावर काय ठोस उपाययोजना करणार, असा गंभीर प्रश्न विचारला. त्यावर उत्तर देताना इराणी म्हणाल्या, केंद्राने सर्व विद्यापीठांमध्ये समुपदेशन कक्ष स्थापन करण्याच्या सूचना केल्या आहेत. परीक्षा काळात विद्यार्थी तणावग्रस्त असतात. त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशक नेमण्याची आवश्यकता आहे. तसेच पालकांनी मुलांवर अपेक्षांचे ओझे लादू नये, त्यांना त्यांचे करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे. ग्रामीण भागातून शहरात अभियांत्रिकीचे विशेषतः आयआयटीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी संकल्पना समजण्यात अडचणी येतात. त्यामुळे ते कोचिंग सेंटरला जाऊ शकत नाही. 'स्वयंम' नावाच्या मोबाइल ॲपद्वारे १३ भारतीय भाषांमध्ये विविध विषयांवरील मोफत तासिका, प्रश्नपत्रिका उत्तरासहित उपलब्ध करून दिल्या जातील. जेणेकरून विद्यार्थ्यांना विविध परीक्षांत मदत होईल. तसेच विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनासाठी स्वतंत्र हेल्पलाइन सुरू केली जाईल, असेही मंत्री इराणी यांनी या वेळी सांगितले.

या वेळी आंध्र प्रदेश, छत्तीसगड, काश्मीर, झारखंड, मिझोराम, ओडिशा, पंजाब, सिक्कीम आणि तेलंगणा राज्यांतील विविध प्रकल्पांचे त्यांनी ई-उद्घाटन केले आणि उपस्थितांशी संवाद साधला. राज्याच्या 'रुसा'च्या प्रकल्प संचालिका मनीषा वर्मा यांनी रुसा अंतर्गत राज्यातील नऊ विद्यापीठांमध्ये सुरू केलेल्या विविध उपक्रमांची माहिती माहितीपटाद्वारे यावेळी सांगितली.

कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यावेळी म्हणाले, रुसाच्या निधीचा विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत संशोधनाला वाव देण्यासाठी विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये एकूण २९ डिजिटल क्लासरूम तयार केल्या जाणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

**'इस्रो'कडून 'भुवन-रुसा' मोबाइल ॲप विकसित**

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत सर्व डिजिटल्स क्लासरूम्स, ऑनलाइन लाइव्ह लेक्चर्स, ई-लर्निंग कन्टेन्ट मोड्युल विद्यार्थ्यांसह सर्वांना मोबाइलवर पाहता येणार आहे. इस्रोकडून भुवन रुसा नावाचे ॲप विकसित केले जाणार असून, लवकरच त्याचे लोकार्पण केले जाणार आहे. रुसाअंतर्गत देण्यात आलेल्या निधीचा विनियोग, त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होत आहे किंवा नाही याची तटस्थ संस्थेकडून पाहणी करून देखरेख ठेवली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.